# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

जा.क्र/अलेप/१८६४/२०१७
दि. ०६/१२/२०१७

## कार्यालयीन आदेश

विद्यापीठाकडे प्रलंबित असलेल्या लेखा परीक्षण अहवालातील एकुण ११६६५ परिच्छेदाच्या तुलनेत विद्यापीठातील विविध कार्यालयांनी अत्यंत अल्प प्रमाणात परिच्छेदाचे अनुपालन सादर केलेले आहेत. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखा संहिता १९९१ च्या ३.४३ मधील तरतूदीमध्ये संबंधीत कार्यालयाने त्यांचेकडील प्रलंबित आक्षेप त्वरीत निकाली काढण्यांत यावे असे निर्देशिले आहे. याबाबत शासन स्तरावरून वांरवार सूचना वजा निर्देश जारी केले जात आहेत. महाराष्ट्र विधानमंडळ, अंदाज समिती (Estimate Committee) ने दि २५ ऑक्टोबर २०१७ रोजी विधानभवन मुंबई येथे कृषि विद्यापीठाशी संबंधीत प्रश्नावर अप्पर मुख्य सचिव (कृषि) यांच्या साक्षीमध्ये विद्यापीठाकडे लेखा परीक्षण अहवालातील प्रलंबित लेखा आक्षेपांबाबत अत्यंत कडक शब्दात कार्यवाही करून या कामात दिरंगाई करणा–यांवर जबाबदारी निश्चित करावी असे निर्देश दिले आहेत.

अंदाज समितीने संबंधीत नियंत्रण अधिकारी/आहरण संवितरण अधिकारी यांच्यावर प्रलंबित असलेल्या आक्षेपांच्या परिपुर्ततेची जबाबदारी निश्चित करण्याबाबत कळविले आहे. आक्षेपाची पुर्तता न झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चीत करून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

सर्व नियंत्रण अधिकारी यांनी त्यांचे व त्यांचे अधिनस्थ असलेल्या कार्यालयांचे प्रलंबित आक्षेपांपैकी गंभीर आक्षेप वसूली (Recovery), Outsanding Advance/Disallowed Expenditure/Excess Payment यासंदर्भात उद्‌भवलेल्या आक्षेपाचा तपशील नियंत्रक कार्यालयास उलट टपाली तात्काळ सादर करावा व सदर गंभीर आक्षेपांची वसुली करून अनुपालन ७ दिवसांचे आत सादर करण्यांत यावे व इतर प्रलंबित आक्षेपांपैकी ५०% आक्षेपांचे अनुपालन एक महिन्याच्या कालावधीमध्ये सादर करण्यांत यावे. सदर प्रकरणाची गांर्भियाने दखल घेण्यांत यावी.

कुलगुरू
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला